लोकमत दि. १०/०२/२०१६

## बाबुल सुप्रियो : ‘भविष्यकाळातील तंत्रज्ञान’ विषयावरील परिषदेचा समारोप

# विकासकामांत नागरिकांचा सहभाग आवश्यक

पुणे: देशाचा विकास व्हायचा असेल, तर सर्व नागरिकांनी त्यात सहभागी झाले पाहिजे. केवळ शहरी भागात नव्हे, तर ग्रामीण भागातसुध्दा ही भावना निर्माण झाली पाहिजे. त्यासाठी तेथे चांगले नेतृत्व उभे राहण्याची गरज आहे. हिवरेबाजारचा सर्वांगीण विकास गावकऱ्यांच्या सहभागातून झाला असल्याचे मत नगरविकास, गृहनिमग्ण आणि शहरी दारिद्रियनिर्मूलन या विभागाचे केंद्रीय राज्यमंत्री बाबुल सुप्रियो यांनी मंगळवारी व्यक्त केले.

माईर्स एमआयटी कॉलेज ऑफ मॅनेजमेंटच्या प्रकल्प व बांधकाम व्यवस्थापन विभागाच्या वतीने आयोजित ‘भविष्यकाळातील तंत्रज्ञान’ या विषयावरील इनसाईट—१६ या राष्ट्रीय पातळीवरील परिषदेच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूहाचे सचिव प्रा. डॉ. मंगेश कराड अध्यक्षस्थानी होते.

गेल इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक ई.एस.रंगनाथन, माईर्स एमआयटीच्या प्रकल्प संचालिका सुनिता कराड, हिवरेबाजारचे सरपंच श्री. पोपटराव पवार, मिटकॉनच्या संचालिका डॉ. सायली गणकर, पुनसारीचे सरपंच हिमांशु पटेल, अकोदराच्या सरपंच ताराबेन पटेल व प्रा. अरिंदम घोष हे यावेळी उपस्थित होते.

सुप्रियो म्हणाले, ‘‘पोपटराव पवार यांनी हिवरेबाजार येथे जो कायाकल्प घडवून आणला व तेथील गावकऱ्यांनी त्यात हिरीरीने भाग घेतला, ते उदाहरण सर्वांनी डोळयांसमोर ठेवले पाहिजे.’’

प्रा. डॉ. मंगेश कराड म्हणाले, ‘‘देशाच्या विकासाची प्रक्रिया नेमकी कशी असते हे विद्यार्थ्यांना समजावे, यासाठी आम्ही ही राष्ट्रीय परिषद आयोजित केली.’’ श्री. पोपटराव पवार म्हणाले, ‘‘गावाची स्थिती फार वाईट होती. उजाड डोंगर आणि सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष होते. मी प्रथम पाण्याच्या प्रश्नाकडे लक्ष दिले. सुरूवातीला आम्ही गावकरी निराश होतो; पण हळूहळू आमच्या प्रयत्नांना यश आले.’’

परिषदेच्या उद्‌घाटनाप्रसंगी महापालिका, आयुक्त कुणाल कुमार म्हणाले, ‘‘स्मार्ट सिटीच्या नामांकनात पुण्याचा क्रमांक देशात दुसरा आहे. असे स्थान मिळविण्यासाठी गुणवत्ता, आर्थिक नियोजन व टिकाऊपणा या तीन घटकांची गरज असते.’’

माईर्स एमआयटी कॉलेज ऑफ मॅनेजमेंटच्या प्रकल्प व बांधकाम व्यवस्थापन विभागातर्फे आयोजित ‘भविष्यकाळातील तंत्रज्ञान’ या विषयावरील ‘इनसाईट–१६ ’ या राष्ट्रीय पातळीवरील परिषदेदरम्यान बाबुल सुप्रियो यांचा सत्कार करताना डॉ. मंगेश कराड. सोबत हिमांशु पटेल, ताराबेन पटेल व प्रा. सुनिता कराड.